जनसामान्यांच्या मनातील आरसा
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | शनिवार
२७.०६.२०२६
# वरुड दर्पण
संपादक - चंद्रकांत भा. भड
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्षः ०७ | अंकः १४७ | पृष्ठेः ०६ | किंमतः ०२
अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
+91 7745067712

# महाराष्ट्रात पुन्हा पेपरफुटीचे सत्र! उद्या होणारी 'टीईटी' परीक्षा रद्द

## ठाण्यातून पेपर जप्त, पोलीस ॲक्शन मोडमध्ये

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – महाराष्ट्रात स्पर्धा परीक्षा आणि पात्रता परीक्षांच्या पेपरफुटीचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाहीये. उद्या (रविवारी) होणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षेचा पेपर फुटल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

पेपर लीक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर शिक्षण विभागाने तातडीने पावले उचलत उद्या होणारी ही परीक्षा रद्द (स्थगित) करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. यामुळे लाखो विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा ही परीक्षा कधी होणार, याची वाट पाहावी लागणार असल्याने परीक्षार्थींमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.




ठाण्यात पैशांची देवाणघेवाण करून पेपर वाटप; पोलिसांची मोठी कारवाई मिळालेल्या माहितीनुसार, उद्या होणाऱ्या या अत्यंत महत्त्वाच्या परीक्षेच्या आधीच ठाणे परिसरामध्ये पेपर फुटल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना त्यांच्या सूत्रांकडून मिळाली होती.

काही टोळ्या पैसे घेऊन विद्यार्थ्यांपर्यंत हा पेपर पोहोचवत असल्याचा सुगावा पोलिसांना लागला होता. माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने सापळा रचून ज्या संशयितांकडे हा पेपर होता, त्यांच्यापर्यंत पोहोचून प्रश्नपत्रिका जप्त केल्या. हा गंभीर प्रकार समोर आल्यानंतर पोलिसांनी तात्काळ शिक्षण विभागाला या संपूर्ण प्रकरणाची सविस्तर माहिती दिली. कोचिंग क्लास चालकांचा हात? काही जण पोलिसांच्या ताब्यात पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या पेपरफुटी प्रकरणी पोलिसांनी काही संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. ताब्यात घेतलेले हे लोक नेमके कोण आहेत? त्यांच्याकडे हा गोपनीय पेपर कसा आणि कुठून आला? यात मोठ्या कोचिंग इन्स्टिट्यूट चालवणाऱ्या लोकांचा किंवा शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांचा हात आहे का? सध्या त्यांची नावे गुप्त ठेवण्यात आली असून, सखोल चौकशीनंतर या रॅकेटचा मुख्य सुत्रधार समोर येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

शिक्षण विभागाकडून परीक्षा स्थगितीची अधिकृत घोषणा होणार आधीच या टीईटी परीक्षे संदर्भात गेल्या काही दिवसांपासून विविध कारणांमुळे मोठी चर्चा रंगली होती.

### टीईटी पेपरफुटीप्रकरणात तिघांना अटक

देशात नीट परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर खळबळ उडाली होती, त्यानंतर सीबीआयने नीट पेपरफुटीप्रकरणी कारवाईचा धडाका लावत अनेकांना अटक केली असून अद्यापही याचा तपास सुरू आहे. मात्र, पेपरफुटीचं हे सत्र काही केल्या थांबताना दिसत नाही. आता, शिक्षकांच्या टीईटी परीक्षेचा पेपर लीक झाल्याने राज्यभरात खळबळ उडाली आहे. पेपर फुटल्याने उद्या २८ जून रोजी होणारी परीक्षा रद्द करण्यात आली असून पोलिसांनीही कारवाईला सुरुवात केल्याचं दिसून येत आहे. याप्रकरणातील टोळी विरोधात भिवंडीत कारवाई करण्यात आली असून तिघांना अटक केल्याची माहिती आहे.

## भारताची मोठी कामगिरी

# कल्पक्कममध्ये जगातील पहिला अणुभट्टीच्या उष्णतेवर चालणारा हायड्रोजन प्रकल्प सुरु

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**चेन्नई** – स्वच्छ आणि कमी कार्बन उत्सर्जनाच्या ऊर्जा क्षेत्रात भारताने ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

अणुऊर्जा विभागाने शुक्रवारी (दि.२६) तामिळनाडूतील कल्पक्कम येथील इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्रात फास्ट ब्रीडर टेस्ट रिॲक्टर मधून निर्माण होणाऱ्या उष्णतेचा वापर करून हायड्रोजन निर्मिती करणाऱ्या जगातील पहिल्या प्रायोगिक प्रकल्पाचे उद्घाटन केले. या प्रकल्पामुळे भविष्यात अणुऊर्जा ही केवळ वीज निर्मितीपुरती मर्यादित न राहता कमी कार्बन उत्सर्जन असलेल्या स्वच्छ हायड्रोजनच्या निर्मितीसाठीही महत्त्वाचा स्रोत ठरणार आहे.





या प्रकल्पाचे उद्घाटन अणुऊर्जा विभागाचे सचिव आणि अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष अजित कुमार मोहंती यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना त्यांनी, 'स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञान आणि अणुऊर्जेचे एकत्रीकरण हे शाश्वत ऊर्जा भविष्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे. मोठ्या प्रमाणावर कार्बनमुक्त हायड्रोजन उत्पादनासाठी अणुऊर्जा प्रभावी पर्याय ठरू शकते,' असे सांगितले.

हा प्रायोगिक प्रकल्प कॉपर-क्लोरिन थर्मोकेमिकल सायकल या तंत्रज्ञानावर आधारित आहे. या प्रक्रियेत पाण्याचे हायड्रोजन आणि ऑक्सिजनमध्ये विभाजन करण्यासाठी विजेऐवजी प्रामुख्याने अणुभट्टीतून मिळणाऱ्या उष्णतेचा वापर केला जातो. कॉपर आणि क्लोरिन संयुगांच्या रासायनिक अभिक्रियांच्या मालिकेतून हायड्रोजनची निर्मिती केली जाते.

# विश्वास नांगरे पाटील भरकटले, आम्हाला वाटलेलं खाकी रंग पोलीस दलाचा : राज ठाकरेंची बेधडक पोस्ट

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** – आयपीएस अधिकरी आणि नुकतीच नागपूर पोलीस आयुक्त म्हणून बदली झालेल्या विश्वास नांगरे पाटील यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्तुती केली.

या कार्यक्रमातील विश्वास नांगरे पाटील यांचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. विश्वास नांगरे पाटील यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्तुती केल्यानंतर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. याचदरम्यान, मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत विश्वास नांगरे पाटील यांना महत्वाचं आवाहन केलं आहे. नांगरे पाटील असोत किंवा अजून कोणी असोत यांना विनंती आहे की सरकारला तुम्ही त्यांच्या किंवा त्यांच्या मागच्या संघटनांच्या मागे धावलात तर त्यांना हे हवंच आहे. परंतू नांगरे पाटील तुम्ही एक चांगले कार्यक्षम अधिकारी आहात, तुम्ही तरी तुमची सद्सद्विवेक राजकीय पक्ष आणि संघटनांसमोर गहाण टाकू नका, असं राज ठाकरे म्हणाले.



विश्वास नांगरे पाटील यांच्यावर राज ठाकरे काय काय म्हणाले? आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांना अचानक दुहेरी निष्ठा दाखवण्याची इच्छा झाली आहे असं दिसतंय.

ते एक पोलीस अधिकारी आहेत, त्यामुळे त्यांची निष्ठा फक्त आणि फक्त पोलीस दलाची जी कर्तव्य आहेत त्याच्याशी असायला हवी. पण इथे नांगरे पाटील यांना त्यांची राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी असलेली निष्ठा दाखवावीशी वाटत आहे.

# नवीन वीज जोडण्यांसाठी सुमारे ४,००० कोटींची तरतूद

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***नाशिक*** – राज्यात नवीन वीज जोडण्यांसाठी सुमारे ४,००० कोटींची तरतूद करण्यात आली असून, उद्योगांसाठी नवीन वीज जोडणीचा खर्च महावितरणमार्फत केला जाणार आहे.

तसेच 'वीज निरंतर' योजनेअंतर्गत आगामी कुंभमेळ्यापूर्वी नाशिक जिल्ह्यात ७,००० नवीन वितरण रोहित्रे बसविण्यात येणार असून, २० वर्षांहून अधिक जुनी रोहित्रे टप्प्याटप्प्याने बदलण्यात येणार आहेत,

## उद्योगांसाठी नवीन वीज जोडणीचा खर्च महावितरण करणार




अशी माहिती महावितरणचे नवनियुक्त संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी दिली. नवीन वीज जोडण्यांसाठी ४,००० कोटी धनंजय औंढेकर यांनी महावितरणच्या आगामी योजनांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, राज्यात नवीन वीज जोडण्यांसाठी सुमारे ?४,००० कोटींची तरतूद करण्यात आली असून, उद्योगांसाठी नवीन वीज जोडणीचा खर्च महावितरणमार्फत केला जाणार आहे. तसेच 'वीज निरंतर' योजनेअंतर्गत आगामी कुंभमेळ्यापूर्वी नाशिक जिल्ह्यात ७,००० नवीन वितरण रोहित्रे बसविण्यात येणार असून, २० वर्षांहून अधिक जुनी रोहित्रे टप्प्याटप्प्याने बदलण्यात येणार आहेत.


महावितरणच्या सर्व सेवा पूर्णपणे ऑनलाइन वीज चोरी रोखण्यासाठी मोबाईल एमएसईबी पथके कार्यरत करण्यात येणार असून, महावितरणच्या सर्व सेवा पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आल्या आहेत.

# कोर्टात अखची कमाल! मानवी वकिलाला मात देत जिंकला पहिलाच खटला, क्लायंटचे वाचले ९ लाख रुपये

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***लंडन*** – कृत्रिम बुद्धिमत्ता आता केवळ लेखन, फोटो किंवा तांत्रिक कामांपुरती मर्यादित राहिलेली नाही. आता अख ने न्यायालयीन व्यवस्थेतही इतिहास रचला आहे.

ब्रिटनमध्ये 'गारफिल्ड एआय' या एआय-आधारित कायदेशीर प्रणालीने मानवी वकिलाविरोधातील न्यायालयीन खटल्यात विजय मिळवत जगातील पहिली अशी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या प्रकरणात फ्रीलान्स मानव संसाधन अधिकारी टॅमिरेस कॅमेल टॅक्डिीर यांचे प्रतिनिधित्व गारफिल्ड अख ने केले. एका हॉस्पिटॅलिटी कंपनीकडून थकीत रक्कम वसूल करण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या ७००० पाउंड (सुमारे ८.७९ लाख रुपये) किमतीच्या 'स्मॉल क्लेम्स कोर्ट'मधील दाव्यात अख ने क्लायंटला विजय मिळवून दिला. सामान्यतः अशा प्रकरणांसाठी पारंपरिक वकिलांवर मोठा खर्च करावा लागतो. मात्र गारफिल्ड अख ने कमी खर्चात संपूर्ण कायदेशीर प्रक्रिया हाताळत क्लायंटचे लाखो रुपये वाचवले. त्यामुळे कायदेशीर क्षेत्रात अख च्या वापराबाबत नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे लंडनमधील वँड्सवर्थ काउंटी कोर्टात जवळपास तीन तास दोन्ही बाजूंचा युक्तिवाद झाला.






# घटस्फोटाचा निकाल लागताच दुसऱ्याच दिवशी विवाहितेला संपवलं

**पतीवर संशय, मोबाईल घेऊन आरोपी फरार**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वर्धा** - वर्धा येथील कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटाचा निकाल लागल्याच्या दुसऱ्याच दिवशी २४ वर्षीय विवाहितेची भररस्त्यात चाकूने सपासप वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी सायंकाळी जुनी कामठी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिरणवार गल्लीत घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, मृत महिलेच्या वडिलांनी जावयावरच हत्येचा संशय व्यक्त केला आहे. मंजू संदीप पचारे (२४, मूळ रा.पाचखेड, ता.पुलगाव, जि.वर्धा) असे मृत महिलेचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन वर्षांपूर्वी मंजूचा विवाह संदीप रामू पचारे याच्याशी झाला होता. मात्र, लग्नानंतर संदीप हा दारूच्या नशेत पत्नीला वारंवार मारहाण करीत असल्याने मंजूने त्याचे घर सोडले आणि वडील राजकुमार पारसे यांच्याकडे वारीसपुरा, कामठी येथे राहू लागली. मंजूने पती संदीप रामू पचारे याच्याविरोधात वर्धा येथील न्यायालयात घटस्फोटासाठी याचिका दाखल केली होती. या प्रकरणाचा निकाल २५ जून २०२६ रोजी लागल्याची माहिती तिचे वडील राजकुमार पारसे यांनी दिली. आरोपीचा शोध सुरु- वारीसपुरा येथील घरी डबा ठेवून ती वडिलांसाठी पाण्याची बाटली घेऊन शुक्रवार बाजारातील दुकानाकडे निघाली होती. सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास हिरणवार गल्लीत अज्ञात आरोपीने तिच्या गळ्यावर आणि पोटावर चाकूने सपासप वार केले. मंजू रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्यानंतर आरोपी तिचा मोबाईल घेऊन शुक्रवार बाजाराच्या दिशेने पळून गेला. पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरु केला आहे.

# 'एसआयआर'खाली सहा कोटी मतदार 'कटाप'

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** - निवडणूक मतदार याद्यांची 'विशेष सखोल पुनर्विलोकलन' (एसआयआर) मोहिमेत वर्षभरात आतापर्यंत ६ कोटी मतदारांची नावे रद्द झाली आहेत. देशात 'एसआयआर' मोहिमेला शुक्रवारी वर्ष पूर्ण झाले. आता १९ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांत मतदार याद्या शुद्ध करण्याची ही प्रक्रिया अद्याप सुरूच आहे.

बिहार विधानसभा निवडणुकांपूर्वी, गेल्या वर्षी २४ जून रोजी प्रायोगिक



तत्त्वावर एसआयआर मोहिमेला सुरुवात झाली. बिहारमधील एसआयआरनंतर, तेथील मतदार यादीतून सुमारे ६५ लाख नावे वगळण्यात आली. ही कारवाई भाजपच्या इशाऱ्यावर कागदपत्रांच्या अभावी नागरिकांना मतदानापासून वंचित ठेवण्यासाठी केली जात असल्याचा आरोप विरोधी पक्ष आणि कार्यकर्त्यांनी केला. मार्चमध्ये सर्वोच्च न्यायालयाने एसआयआर राबवण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाची घटनात्मक वैधता एकमताने कायम ठेवली.

पश्चिम बंगाल आणि बिहारमध्ये ज्या व्यक्तींची नावे एसआयआर दरम्यान वगळली आहेत, त्यांना सरकारी कल्याणकारी योजनांच्या लाभांपासून वंचित ठेवले जात आहे.

# आता सत्तेसाठी पक्ष फोडण्याची गरज काय?

**खासदार सुप्रिया सुळे यांचा भाजपला सवाल**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**पुणे** - जीएसटीसारख्या महत्त्वाच्या बिलांसाठी काँग्रेसने नेहमीच सहकार्य केले आहे, मग आता सत्ता टिकवण्यासाठी पक्ष आणि घरे फोडण्याची काय गरज आहे? असा प्रश्न खासदार सुप्रिया सुळे यांनी 'ऑपरेशन टायगर' आणि खासदारांच्या पक्षांतरावरून उपस्थित केला. देशामधून लोकशाही संपुष्टात येते की काय, अशी भीती वाटते असेही त्या म्हणाल्या. पुण्यात पत्रकारांशी बोलताना त्यांनी वरील प्रश्न उपस्थित केला.

महाराष्ट्रात सध्या कायद्याचे राज्य नसून गुन्हेगारांना पोलिसांचा धाक उरलेला नाही. राज्यात केवळ जाहिरातबाजी आणि पक्ष फोडण्याचे काम सुरू असून सामान्य जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जात आहे, अशी टीकाही सुळे यांनी केली.

मविआतील समन्वयाबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, दिल्लीत 'इंडिया' आघाडीचे काम अतिशय संघटितपणे सुरू असून रोज सकाळी धोरण ठरवले जाते.

राज्यातील आमदारांच्या गैरहजेरीबाबत त्यांनी स्पष्ट केले की, अनेक आमदार पूर्वपरवानगी घेऊन वैयक्तिक कामांमुळे उपस्थित राहू शकले नाहीत. मध्य प्रदेशातील भ्रष्टाचार आणि अयोध्येतील राम मंदिरासाठी जमा केलेल्या चांदीच्या विटांचा हिशोब या मुद्द्यांवरून त्यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला.

**स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय येथे**

# राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** - स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय वरूड येथे राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ शिक्षक माणिकदास बेलुरकर याचे हस्ते हारार्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक विजय आडे यांनी शाहू महाराज हे खरे लोकशाहीवादी आणि समाजसुधारक मानले जातात.

शाहू महाराज हे एक सक्षम राज्यकर्ते होते. त्यांच्या राजवटीत शाहू महाराजांनी अनेक पुरोगामी धोरणे यशस्वीपणे राबवली.

१८९४ मधील त्यांच्या राज्याभिषेकापासून ते १९२२ मध्ये त्यांच्या निधनापर्यंत त्यांनी राज्यातील मागास जातींतील लोकांसाठी काम केले. जात-पंथाची पर्वा न करता सर्वांना प्राथमिक शिक्षण देणे हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे प्राधान्य होते, असे सांगितले.

यावेळी शिक्षक सुनील उईके, कर्मचारी कैलास गोंडेकर उपस्थित होते.

**जनता हायस्कूल व श्री.एन.जी.मोघे कनिष्ठ महाविद्यालयात**

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** - जनता हायस्कूल व श्री.एन.जी.मोघे कनिष्ठ महाविद्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या फोटोचे पूजन व हारार्पण मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. यावेळी योगेश फुटाणे, प्रविण गणोरकर, दिनेश जाधव, कमलेश अकर्ते, राजू देशमुख इत्यादी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व संचालन प्रविण आकोटकर यांनी केले होते.



# करुणा बुद्ध विहार येथे ४ दिवशीय निवासी शिबिराचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** - त्रिरत्न बौद्ध महासंघ वरूड-मोर्शी, काटोल द्वारा धम्मचारी, धम्मचारिणी, धम्ममित्र महिला पुरुष यांच्यासाठी ४ दिवशीय निवासी शिबिराचे आयोजन करुणा बुद्ध विहार वरुड येथे नुकतेच करण्यात आले होते.

सुख समृद्धीचा आणि निर्वाणाचा मार्ग - दिघजानु सूत्त या विषयावर धम्मचारी नागकेतु नागपूर यांच्या मार्गदर्शनात शिबीर घेण्यात आले.

या सुत्तात गृहस्थ दिघजानु तथागत भगवान बुद्धांना प्रश्न विचारतो, की गृहस्थ जीवनामध्ये सुख आणि संपत्ती वाढवण्यासाठी काय उपाय केले पाहिजे? यावेळी उटठान संपदा, आरक्खसंपदा, कल्याण मित्रता, समजीविकता, एक हिस्सा रोजच्या जीवनासाठी आणि परिवाराच्या पालनपोषणासाठी ठेवावा, दोन हिस्से व्यापार धंद्यात परत लावणे, एक हिस्सा संकट काळासाठी बचत करावा. या प्रकारे नियोजन केले तर मनुष्य कंगाल होणार नाही, असे सांगितले.



शिबिराची सुरुवात समर्पण समारंभ, त्रिसरण, पंचशील, विधायक शील व बुद्ध पूजेनी झाली.

रोज सकाळी त्रिरत्न वंदना व ध्यान साधना, प्रवचन,गटचर्चा, प्रश्नोत्तरे, बुद्धांनुस्मृती, संपर्क, रात्री पाली पूजा, सप्तांग पूजा, त्रीअंगी पूजा घेण्यात आली. सेंटरचे सर्व धम्मचारी,धम्मचारिणी व धम्म मित्र यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

या शिबिरात एकूण ३९धम्मचारी, धम्मचारिणी तसेच धम्ममित्र महिला-पुरुष उपस्थित होते.

# सरजूबाई उपाध्याय यांचे निधन



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - येथील रहिवासी सरजूबाई परसराम उपाध्याय यांचे वयाच्या ६६ व्या वर्षी नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनामुळे परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त त्यांची अंतिम यात्रा आज त्यांचे निवासस्थान सत्यदेव नगर, रिंग रोड, वरुड येथून निघुन केदारेश्वर मोक्षधाम येथे त्यांच्या शहरवासी, आप्तेष्ट, नातेवाईक, स्वकीय यांचे उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, नातवंड असा मोठा आप्त परिवार आहे.

# जरुड गावातील भारतीय सैन्यात दाखल झालेल्या ओमचा गौरव

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**जरुड** - येथील एका सामान्य कुटूंबातून सतत २ वर्षे भरतीपूर्ण प्रशिक्षण घेवून जिवाची पर्वा न करता ऊन, वारा, पाऊस डोक्यावर घेत जिद्दीने मेहनत करुन मागील सैन्य भरती मध्ये अग्निवीर म्हणुन त्यांचे निवड झाली. त्याबद्दल ओम यादव खेरडे याचा गावकऱ्यांच्या वतीने त्याच्या निवासस्थानी जावुन सन्मान करण्यात आला.

एकुलता एक मुलगा ओम याला देशाची सेवा करण्याकरीता कविता व यादव खेरडे या दोन्ही माय बापांनी सैन्यात देशाची सेवा करायला पाठविणे म्हणजे खरच त्यांची देशाप्रती प्रेम. आई वडीलांनी घेतलेल्या मायबापांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार व सन्मान व्हायला पाहीजे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ओमची निवड महार रेजिमेंट सागर मध्यप्रदेश प्रशिक्षण करीता झाली असून तो २५ जून ला जाणार असून त्यांच्या निवासस्थानी जावून माजी सरपंच तथा माजी सैनिक सुधाकर मानकर यांनी ओमचा शाल, श्रीफळ, रोहीदास महाराज यांची प्रतिमा, गीता देवून सत्कार व सन्मान करण्यात आला. यावेळी अध्यक्ष तंटामुक्त समिती रविंद्र बाननळे, माजी प्राचार्य उल्हास तडस, रामदास मानकर, सुरज पोकळे, शुभम मानकर, पिंपळखुटाचे सरपंच गजानन पडोळे व समस्त गावातील नागरिकांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

# रिडिंग घेणाऱ्या महावितरण कर्मचाऱ्यांना ओळखपत्र बंधनकारक करा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**ग्राहक पंचायत संघटक कमलाकर देशमुख यांची मागणी**

**वरुड** - महावितरण (इलेक्ट्रिक) कर्मचाऱ्यांनी घराघरांत जाऊन मीटर रीडिंग घेणे तसेच वीजबिल वाटप करताना गळ्यात ओळखपत्र बंधनकारकपणे परिधान करावे, अशी मागणी राज्य ग्राहक पंचायत संघटक तथा माजी तहसीलदार कमलाकर देशमुख यांनी केली आहे.

देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महावितरणचे कर्मचारी मीटर रीडिंग व वीजबिल



वितरणासाठी घराघरांत जात असतात. अनेक वेळा घरातील पुरुष मंडळी नोकरी किंवा कामानिमित्त बाहेर असतात. अशा वेळी घरात महिला व लहान मुलेच असतात. त्यामुळे अनोळखी व्यक्तीची ओळख पटणे कठीण होते व अप्रिय घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे ग्राहकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महावितरणच्या सर्व कर्मचाऱ्यांनी गळ्यात स्पष्ट दिसेल असे अधिकृत ओळखपत्र परिधान करणे बंधनकारक करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. यापूर्वीही ग्राहक पंचायतच्या बैठकीत हा विषय उपस्थित करण्यात आला होता. मात्र अद्याप त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्राहकांचा विश्वास वाढावा आणि सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी, यासाठी महावितरण प्रशासनाने तातडीने याबाबत निर्णय घेऊन सर्व कर्मचाऱ्यांना ओळखपत्र परिधान करणे सक्तीचे करावे, अशी मागणी कमलाकर देशमुख यांनी केली आहे.

## संपादकीय

**अडचणी जीवनाचा भाग आहेत, पण धैर्य विजयाचा मार्ग आहे.**

### प्रतीक्षेतला पाऊस आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांची चिंता

यंदाच्या मान्सूनच्या आगमनाकडे संपूर्ण मराठवाडा डोळे लावून बसला होता. गेल्या काही वर्षांपासून हवामानातील अनिश्चितता, अपुरा पाऊस आणि वारंवार उद्भवणाऱ्या दुष्काळी परिस्थितीमुळे मराठवाड्यातील शेतकरी आधीच संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत यंदा मान्सून वेळेत दाखल होईल आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती. अखेर दीर्घ प्रतीक्षेनंतर मान्सूनने मराठवाड्यात हजेरी लावली असली तरी अद्याप पेरणीसाठी आवश्यक असलेल्या दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. काही जिल्ह्यांत झालेल्या जोरदार पावसामुळे आशेचे किरण निर्माण झाले असले, तरी अनेक भागांतील शेतकरी अजूनही समाधानकारक पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. मराठवाडा हा पारंपरिकदृष्ट्या दुष्काळग्रस्त प्रदेश मानला जातो. या भागातील बहुतांश शेती ही पावसावर अवलंबून आहे. सिंचनाची उपलब्धता अत्यंत मर्यादित असल्याने खरीप हंगामाचे संपूर्ण गणित मान्सूनवरच अवलंबून असते. जून महिन्याच्या सुरुवातीपासूनच शेतकरी शेताची मशागत, बियाणे आणि खतांची व्यवस्था करण्यात व्यस्त झाले होते. अनेकांनी कर्ज काढून शेतीची तयारी केली. मात्र, मान्सूनच्या आगमनाला झालेल्या विलंबामुळे त्यांच्यासमोर चिंतेचे वातावरण निर्माण झाले. यंदा मान्सूनच्या प्रारंभी काही ठिकाणी हलका पाऊस झाला. या पावसामुळे अनेक शेतकऱ्यांनी पेरणीची घाई केली. मात्र त्यानंतर पावसाने पुन्हा ओढ दिल्याने पिकांच्या उगवणीवर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे. अनेक भागांमध्ये पेरलेले बियाणे जमिनीतच अडकून राहिले असून, काही ठिकाणी दुबार पेरणीचे संकटही उभे राहू शकते. दुबार पेरणी म्हणजे शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त आर्थिक भार. आधीच वाढलेले उत्पादन खर्च, महागलेली बियाणे आणि रासायनिक खतांच्या किमती यामुळे शेतकरी अचणीत आहे.

मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये गेल्या काही दिवसांत झालेल्या चांगल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. बीड, लातूर, नांदेड आणि परभणीच्या काही भागांत समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी पेरणीच्या कामांना वेग दिला आहे. शेतशिवारात पुन्हा एकदा चैतन्य निर्माण झाले आहे. बैलजोड्या, ट्रॅक्टर आणि शेतीची अवजारे पुन्हा कामाला लागली आहेत. शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आशेचे हास्य दिसत असले तरी ही परिस्थिती संपूर्ण मराठवाड्यात एकसमान नाही. अनेक तालुक्यांमध्ये अजूनही पावसाचे प्रमाण अत्यल्प आहे. विशेषतः जालना, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव आणि हिंगोलीच्या काही भागांमध्ये शेतकरी अजूनही आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत. ढगांची गर्दी होते, विजांचा कडकडाट होतो; मात्र अपेक्षित पाऊस पडत नाही. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील काही दिवसांत पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली असली तरी हवामानातील सततच्या बदलांमुळे शेतकऱ्यांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण आहे. हवामान बदलाचा परिणाम शेती क्षेत्रावर स्पष्टपणे जाणवत आहे. पूर्वी मान्सूनचे आगमन, पावसाचे वितरण आणि कालावधी यामध्ये तुलनेने सातत्य होते. मात्र आता कधी अतिवृष्टी, तर कधी दीर्घ खंड अशा स्वरूपात पाऊस पडत आहे. कमी कालावधीत अतिवृष्टी होऊन पिकांचे नुकसान होते, तर दीर्घकाळ पाऊस न पडल्याने पिके करपतात. या बदलत्या परिस्थितीत पारंपरिक शेती पद्धतींमध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे. यासाठी जलसंधारणाच्या उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.

# राजर्षी शाहू महाराज समतेचे राजे



शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे नाव यशवंत, वडिलांचे जयसिंगराव (आप्पासाहेब) व आईचे नाव राधाबाई होते.

कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत?नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले व शाहू हे नाव ठेवले. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर इ.स. १९२२ सालापर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हा-पूर संस्थानाचे राजे होते. मुंबई येथे ६ मे ६ १९२२ रोजी त्यांचे निधन झाले.

शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स. १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. इ.स. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी इ.स. १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त प्रकरण शाहू महाराजांच्याच काळात झाला.

'शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल', शाहुपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांची सहकारी संस्था, शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापण्यात त्यांचा प्रमुख वाटा होता. राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून देणे अशा उपक्रमांतूनही त्यांनी कृषिविकासाकडे लक्ष पुरवले.

भारत देशात कैक वर्षापासून समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, सर्व घटकांना विकासाची समान संधी उपलब्ध नव्हती. पण ही तत्त्वे राजर्षी शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. म्हणूनच त्यांचा देशभरात 'महाराजांचे महाराज' असा गौरव होतो. शाहू महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली.

राजर्षी शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी फार तळमळ होती. कारण माणसाला पशुत्वापासून मनुष्यत्व मिळवून देणारे एक प्रभावी अस्त्र म्हणजे शिक्षण होय. त्यामुळे शिक्षणाशिवाय आपला उध्दार होणार नाही. हे राजर्षींनी ओळखले होते. म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. एवढेच नाही तर ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळांची निर्मित केली. आणि एवढ्यावरही महाराज थांबले नाहीत तर जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रू. दंड आकरण्याची कायदेशीर तरतूद केली. त्यांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.

अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दुष्ट पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देर्णाया पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देर्णाया, तंत्रे व कौशल्ये शिकवर्णाया शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. शाहू राजे हे त्यांच्या कर्तृत्वामुळे नावाप्रमाणेच यशवंत राहिले. छत्रपती शिवरायांच्या विचारांचा व कार्याचा वारसा मोठ्या समर्थपणे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक महान मानवतावादी राजा म्हणून राजर्षी शाहू महारजानी आपली ओळख निर्माण केली. या व्यापक दूरदृष्टीच्या राजाने त्याकाळी राजेशाही असतानासुध्दा सामाजिक बंधूभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उध्दार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रिडा व आरोग्य इत्यादी महत्वपूर्ण क्षेत्रामध्ये आजच्या लोकशाहीतील शासनालाही करणे शक्य होत नाही. असे अद्वितीय स्वरुपाचे कार्य केले.

मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे. हा व्यापक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून या निधड्या छातीच्या समाजसुधारकाने ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली. नुसती घोषणा करुन थांबणारे ते राजे नव्हते तर त्वरीत अंमलबजावणी करुन संबंधीत अधिकाऱ्याकडून अहवाल मागविले. शाहूंच्या या निर्णयाला तेंव्हा सामाजिक कार्यकर्ते म्हणवणाऱ्या अनेक उच्चवर्णीय पुढाऱ्यांनी विरोध केला. राजर्षींवर अनेक प्रकारचे आरोप केले. त्यांनी अस्पृश्यांना (त्या काळात अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीच्या) राखीव जागांची तरतूद करून सरकारी नोर्कया मिळवून दिल्या. शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी (तत्कालीन) अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश त्यांनी कोल्हापूर संस्थानात काढला.

१९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. तसेच त्यांनी देवदासी प्रथा बंद करण्यासाठीही कायद्याची निर्मिती केली. त्यावेळेस धर्मव्यवस्थेने स्त्रियांना अतिशय उपेक्षित ठेवले. त्यांचे हक्क, अधिकार, नाकारले. स्त्री म्हणजे केवळ चूल व मूल या पुरतीच मर्यादित ठेवली. त्याकाळी धर्माच्या नावाखाली देवांना मुले-मुली वाहण्याची अतिशय विचित्र पद्धत आपल्या देशात चालू होती. परंतु राजांनी आपल्या संस्थानात जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा करून ही पद्धत बंद पाडली. जातीभेदाचे प्रस्थ नष्ट व्हावे म्हणून आपल्या संस्थानात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशर मान्यता दिली. तसा कायदा पारित केला आणि याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना आपल्या चूलत बहीणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. एवढेच नव्हे तर संस्थानात जवळजवळ १०० मराठा धनगर विवाह घडवून आणले. अशा अनेक कार्याच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांना सन्मानाची वागणूक व दर्जा मिळवून दिला. परंतु आज एकविसाव्या शतकामध्ये आणि लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये मात्र स्त्रिभ्रूणहत्या, हूंडाबळी सारख्या अनेक माध्यमातून स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात बळी दिला जात आहे. आज स्त्रीयांना या संकटातून बाहेर काढावयाचे असेल तर राजर्षी शाहूंचा स्त्रीविषयक व्यापक दृष्टीकोनच आपण स्विकारणे ही काळाची गरज आहे. तत्कालीन परिस्थितीमध्ये जातीव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण, सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारला. त्यामुळे त्यांचे जीवन नैराश्यमय झाले. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी चोऱ्या, दरोड्यांचा मार्ग अवलंबला. त्यामुळे ब्रिटीश सरकारने या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावावी लागत असे. शाहू राजांना या लोकांविषयी कणव होती. कारण ते खऱ्या अर्थाने वंचितांचे राजे होते. त्यामुळे शाहूंनी हजेरी पद्धत बंद केली. या जाती जमातींच्या लोकांना एकत्रित करुन गुन्हेगारीपासून त्यांना परावृत्त केले. त्यांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार, रथाचे सारथी निर्माण केले. त्यांना घरे बांधून दिली. वनवन भटकणाऱ्या लोकांना राहण्याची सोय झाली. पोटापाण्याची सोय झाली. त्यामुळे गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेल्या लोकांना माणूस म्हणून समाजात सन्मानाने वावरता येऊ लागले.

गुन्हेगारांना शासन करणारा सत्ताधीश सर्वत्र पहायला मिळेल. मात्र त्यांना प्रेमाने, मायेने आपलेसे करुन समाजात सामाजिक दर्जा देणारा व त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणारा राजा विरळाच.

वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त संघर्ष राजर्षी शाहूंच्याच काळात झाला. हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वादळच होते. या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ आणखी प्रेरित झाली. बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना त्यांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली. त्यांनी सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य केले.

शाहू छत्रपती स्पिनिंग अँड विव्हिंग मिल'ची स्थापना, शाहुपुरी व्यापारपेठेची स्थापना, गुळाच्या बाजारपेठेची निर्मिती, शेतर्क?यांच्या सहकारी संस्थांची स्थापना, राधानगरी धरणाची उभारणी, शेतर्क?यांना कर्जे उपलब्ध करून देणे असे उपक्रम त्यांनी आपल्या संस्थानात राबविले, कमालीचे यशस्वी केले. शेती, उद्योग, सहकार या क्षेत्रांत राजर्षींनी नवनवे प्रयोग केले. शेतीच्या आधुनिकीकरणासाठी त्यांनी संशोधनाला पाठिंबा दिला, नगदी पिके व तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यासाठी त्यांनी 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट' स्थापन केली. राजांनी त्याकाळी पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन राधानगरी नावाचा प्रकल्प उभा केला. जेणेकरून भविष्यात माझ्या रयतेला दुष्काळाला सामोरे जावे लागणार नाही ही दूरदृष्टी ठेवून राधानगरी धरणाची निर्मिती केली. राजषी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रांतील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्कार्य केले. महाराजानी कोल्हा-पूर, बेळगाव या भागातील स्वातंत्र्यवीराना वेळोवेळी आर्थिक व इतर मदत केली.

शाहू महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रृत आहेत. डॉ.बाबासाहेबांनी 'मूकनायक' हे साप्ताहिक ३१ जानेवारी १९२० ला प्रथम प्रकाशित केले. परंतु आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद पडले. परंतु हे राजर्षी शाहू महाराजांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तात्काळ आर्थिक मदत केली. अनेक राजांना जे जमलं नाही ते या राजाने करून दाखवले, केवळ नामधारी राजा नव्हता.

साऱ्या समाजाला एक करणारी लेकुरवाळी माय होती. सर्वसामान्यांचं भलं करण्यासाठी तेवढं काळीज मोठं असावं लागतं, ते काळीज याच राजांकडे होतं, 'आम्ही तर परंपरेचे राजे, तुम्ही तर ज्ञानाचे राजेः म्हणून मी तुमच्या घरी आलोःङ्क बाबासाहेबांना असा म्हणणारा हा 'राजा' खऱ्या अर्थाने लोकराजा होता. 'एक वेळ माझी जयंती नाही केली तरी चालेल, पण राजश्री शाहू महाराजांची जयंती सणाप्रमाणे साजरी करा...!' हे बोल आहेत, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचेः

आज या लोकराजाची जयंतीः.
त्यानिमित्त सर्वांना सदिच्छा!!
आणि राजश्री शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!!!

**आर.के.जुमळे**

# मोदींच्या व्यापारदृष्टीने खुली केली जगाची दालने

युनायटेड किंगडमसोबतचा ऐतिहासिक व्यापार करार १५ जुलै रोजी अंमलात येत असून, हा करार जागतिक संधी निर्माण करेल आणि भारतीय शेतकरी, एमएसएमई, मच्छिमार, स्टार्टअप्स आणि कारागिरांसाठी समृद्धी घेऊन येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ च्या मोहिमेला पुढे नेण्यासाठी हा करार अनेक रोजगार निर्माण करेल आणि भारतीय नागरिकांसाठी रास्त दरात उच्च दर्जाच्या वस्तू उपलब्ध करून देईल.

भारत आणि यूके यांच्यातील हा परिवर्तनकारी सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार विविध क्षेत्रांतील, विशेषतः श्रम-प्रधान क्षेत्रांतील भारतीय वस्तूंसाठी युनायटेड किंगडमच्या बाजारपेठेत सर्वसमावेशक प्रवेश सुनिश्चित करेल. दोन्ही देशांसाठी फायदेशीर ठरणारा हा करार शुल्क आकारणीच्या जवळपास ९९% श्रेणींवरील आयात शुल्क काढून टाकेल. यात एकूण व्यापार मूल्याचा जवळपास १००% वाटा समाविष्ट असल्याने भारतीय निर्यातीसाठी मोठ्या प्रमाणात संधी निर्माण होतील.

हा सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार लोककेंद्रित करार आहे. या करारा-वर गेल्या वर्षी पंतप्रधान मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान सर कीर स्टारमर यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली होती. समाजातील सर्व घटकांना फायदे मिळवून देणारा हा करार आहे. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या देशांतर्गत हितसंबंधांसोबत कोणतीही तडजोड न करता उच्च दर्जाच्या निर्यात बाजारपेठांमध्ये प्रवेश करणे शक्य होणार आहे. युनायटेड किंगडमच्या मोठ्या प्रमाणात विस्तारलेल्या बाजारपेठेत सागरी खाद्यपदार्थांची निर्यात वाढल्यामुळे मच्छिमार बांधवांना फायदा होईल. श्रम-प्रधान क्षेत्रांमध्ये कामगारांना रोजगाराच्या नवीन संधी मिळतील. महिला उद्योजक, तरुण, स्टार्टअप्स आणि एमएसएमई यांना जागतिक मूल्य साखळीत अधिक चांगल्या प्रकारे प्रवेश मिळेल. तसेच, व्यावसायिक लोकांना वाढीव गतिशीलता आणि स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या नवीन संधींचा लाभ मिळेल.



शेतकऱ्यांची भरभराट होणार : सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार इतर युरोपीय देशांना मिळणाऱ्या फायद्यांच्या तोडीस तोड किंवा त्याहून अधिक फायदे मिळवून देत भारतीय शेतकऱ्यांसाठी युनायटेड किंगडमची अतिशय उच्च दर्जाची बाजारपेठ खुली करणारा आहे. हळद, मिरी, वेलची आणि आमरस, लोणची व डाळी यांसारख्या प्रक्रिया केलेल्या वस्तूंना शुल्कमुक्त प्रवेश मिळेल. उच्च कृषी निर्यातीमुळे शेतीतील उत्पन्नाला चालना मिळेल आणि गुणवत्ता, पॅकेजिंग (वेष्टन) व प्रमाणीकरण वाढवण्यासाठी मोठे प्रोत्साहन मिळेल. यामुळे कृषी मूल्य साखळीत अनेक रोजगारही निर्माण होतील.

त्याचवेळी, देशांतर्गत शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, विशेषतः दुग्धजन्य पदार्थ, तृणधान्ये, भरड धान्ये, सफरचंद, ओट्स आणि खाद्यतेल या क्षेत्रांशी संबंधित असलेल्या शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी, सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार कराराने भारताच्या अत्यंत संवेदनशील कृषी क्षेत्रांना यातून वगळले आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# उच्च न्यायालयाचा पोलीस अधिकाऱ्याला २५ हजारांचा दंड

## एफआयआरची प्रत नाकारणे अधिकाऱ्याला भोवले

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – आरोपींना तक्रार किंवा एफआयआरची प्रत देण्यास वारंवार नकार देणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांच्या प्रवृत्तीवर मुंबई उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कायदेशीर तरतूद असूनही प्रत नाकारल्याप्रकरणी न्यायालयाने वाडा पोलीस ठाण्याच्या स्टेशन हाऊस ऑफिसरला (एसएचओ) वैयक्तिक २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला असून त्यांना पाच दिवसांच्या आत याचिकाकर्त्यांना तक्रारीच्या प्रती देण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम आकुड यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असलेल्या काही व्यक्तींनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावर न्यायालयाने आदेश दिले.

याचिकाकर्त्यांनी न्यायालयात सांगितले की, पोलिसांची नोटीस मिळाल्यानंतर ते पोलीस ठाण्यात हजर झाले होते. मात्र, त्यांच्याविरुद्ध दाखल असलेल्या तक्रारीची प्रत मागितली असता, पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किद्रे यांनी ती देण्यास स्पष्ट नकार दिला. उलट, त्यांनी याचिकाकर्त्यांवर वेळ वाया घालवल्याचा ठपका ठेवला. या आधी पालघरच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या प्रकरणातही त्यांना अशाच त्रासाला सामोरे जावे लागले होते, असेही याचिकाकर्त्यांनी नमूद केले. कडक टिप्पणी या प्रकरणावर राज्य सरकारच्या वकिलांना समाधानकारक स्पष्टीकरण देता आले नाही.

# मुंबई विद्यापीठाच्या कीर केंद्राचे मोठे यश

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – नद्यांमधील मायक्रोप्लास्टिकचे वर्गीकरण करण्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेंद्राने तयार केलेल्या उपकरणाने मोठे यश मिळवले आहे. या उपकरणाला भारत सरकारतर्फे डिझाईन पेटंटची मंजूर झाले आहे.

डॉ.धनंजय कीर रत्नागिरी उपपरिसरातील पर्यावरण शास्त्र विभागाचे संशोधक डॉ.पांडुरंग यशवंत पाटील यांच्या या अभिनव




उपकरणाला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून यामुळे नदी प्रदूषण नियंत्रणासाठीच्या संशोधनाला नवी दिशा मिळणार आहे. नद्यांच्या प्रवाहात ५ मिलीमीटरपेक्षा लहान असलेले मायक्रोप्लास्टिक कण अडवून, त्यांचे पद्धतशीर वर्गीकरण करता येईल अशी या उपकरणाची रचना करण्यात आहे. नदीतील जैविक कचरा (पाने, काड्या) आणि प्लास्टिक कण एकमेकांपासून वेगळे करण्यासाठी यात 'मल्टी-स्टेज फिल्टरेशन' संकल्पनेचा विचार करण्यात आला आहे.

हे उपकरण भविष्यात सौर ऊर्जेचा वापर करून चालवण्याचे आणि त्यात स्वयंचलित फिल्टर क्लीनिंग व रिअल-टाइम डेटा देणारे स्मार्ट सेन्सर्स समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे.

# विभागीय आयुक्तालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना अभिवादन

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



***अमरावती*** – सामाजिक न्यायाचा पाया रचणारे लोककल्याणकारी राजे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज सहाय्यक आयुक्त श्रीमती वैशाली पाथरे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी नायब तहसीलदार शामसुंदर देशमुख, सहा. महसूल अधिकारी राहुल बोबडे, आशिष अंबाडकर, नाझर शरद लोणारे यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

उपस्थितांनीही छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# श्रीक्षेत्र आळंदीच्या विकासासाठी शासन सकारात्मक

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** – उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांनी आज श्रीक्षेत्र आळंदी येथे भेट देऊन संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीचे दर्शन घेतले.

यावेळी त्यांनी माऊलींच्या चरणी राज्यातील जनतेच्या सुख-समृद्धीचे आणि सर्वांगिण विकासाचे साकडे घातले. दर्शनानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांनी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या विश्वस्तांसोबत बैठक घेऊन संस्थानच्या विविध कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी विश्वस्तांनी श्रीक्षेत्र



आळंदीच्या विकासासंदर्भातील विविध प्रस्ताव, भाविकांसाठी आवश्यक सुविधा, पायाभूत विकासकामे तसेच संस्थानसमोरील विविध प्रलंबित प्रश्न मांडले. या संदर्भातील सविस्तर निवेदनही संस्थानच्यावतीने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना सादर करण्यात आले.

निवेदनातील मागण्या आणि विविध विषयांवर शासनस्तरावर सकारात्मक विचार करण्यात येईल. संबंधित विभागांशी समन्वय साधून योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी दिली.

श्रीक्षेत्र आळंदी हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून येथे येणाऱ्या लाखो भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचेही सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केले. तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर 'दर्शन बारी' चा विषय मागील १२ वर्षापासून प्रलंबित आहे तो लवकर मार्गी लावण्याबाबत ग्वाही दिली.

# जिल्हाधिकारी कार्यालयात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना अभिवादन



■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***अमरावती*** – सामाजिक न्यायाचा पाया रचणारे लोककल्याणकारी राजे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज विधी अधिकारी नरेंद्र बोहरा यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी अल्पेश हाते, नाझर विजय सांगळे यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# म्हाडाला सदनिकेची किंमत वाढवण्याचा अधिकार : मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***मुंबई*** – म्हाडाच्या सदनिकेची किंमत कालावधीनुसार वाढलेल्या खर्चाचा विचार करून पुन्हा निश्चित करण्याचा अधिकार मुंबई उच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे. मात्र, त्याचवेळी संबंधित ग्राहकाला घराचा ताबा सोडू नये, यासाठी थकबाकी भरण्याची संधी देऊन त्यांना दिलासा दिला आहे.

न्यायमूर्ती एम. एम. साठे यांनी पुणे म्हाडाच्या वतीने दाखल केलेली याचिका अंशतः मंजूर केली. २००६ च्या अपीलिय आदेशाला म्हाडाने या याचिकेद्वारे आव्हान दिले होते. विठ्ठल लाडकत यांना १९९३ मध्ये पुण्याच्या कोथरूड भागात राज्य सरकारच्या २ टक्के विवेकाधीन कोट्यातून सदनिका देण्यात आली होती. ताबा त्वरित देण्यात आला असला तरी, अंतिम किंमत मे १९९५ मध्ये कळवण्यात आली होती, ज्यात म्हाडाने ५.५१ लाख मागणी केली होती. लाडकत यांनी ही रक्कम अमान्य करत किंमत १.४१ लाख रुपये असावी असा दावा केला होता.

न्यायालयाचे निरीक्षण उच्च न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले की, सरकारी कोट्यातून सदनिका मिळाली तरी संबंधित व्यक्तीला महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास कायद्यानुसार ठरलेली किंमत आणि इतर शुल्क देण्यापासून सुटका मिळत नाही. सदनिकेची किंमत स्थिर राहू शकत नाही बांधकामानंतर काही वर्षांनी सदनिका वाटप केल्यास, वाढलेला बांधकाम खर्च आणि बाजारभावातील वाढ लक्षात घेऊन किंमत सुधारित करण्याचा अधिकार म्हाडाला आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. कोथरूडमधील सदनिकेची किंमत १९८७ (बांधकाम वर्ष) ते १९९३ (वाटप वर्ष) या काळात स्थिर राहू शकत नाही, असेही न्यायालयाने नमूद केले.

थकबाकी भरण्याची संधी म्हाडाने वाटपानंतर मागणी करण्यासाठी दोन वर्षे विलंब लावला होता. त्यामुळे या कालावधीतील व्याजाचा दावा फेटाळला. केवळ मे १९९५ पासून ९ टक्के दराने व्याज देण्याचे निर्देश देण्यात देत थकबाकी भरण्याची संधी दिली आहे.

# श्रीकांत शिंदे यांना कॅबिनेट, प्रतापराव जाधवांचं मंत्रिपद जाणार

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** – केंद्रीय मंत्रिमंडळाच्या संभाव्य विस्तारात श्रीकांत शिंदे यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळण्याची शक्यता आहे. 'ऑपरेशन टायगर'च्या यशानंतर केंद्रीय मंत्रिमंडळात शिवसेनेला एक कॅबिनेट मंत्रीपद मिळण्याची शक्यता आहे. कॅबिनेट मंत्रीपदासाठी शिंदेंच्या शिवसेनेकडून एकनाथ शिंदे यांचे पुत्र आणि कल्याणचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या नावाची चर्चा असल्याची सूत्रांची माहिती आहे. तर एक राज्यमंत्रीपद ठाकरेंच्या शिवसेनेतून फुटलेल्या सहा खासदारांपैकी एकाला मिळण्याची शक्यता आहे. या मंत्रिपदासाठी परभणीचे खासदार संजय उर्फ 'बंडू' जाधव यांचे नाव आघाडीवर आहे. संजय जाधव सलग तिसऱ्यांदा परभणीचे खासदार म्हणून निवडणून आले आहेत. श्रीकांत शिंदे यांच्या नावाला भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाचीही पसंती पक्ष संघटनेच्या दृष्टीने राज्यमंत्रीपद विदर्भात ठेवायचे की मराठवाड्यात?, यावरून शिंदेंच्या शिवसेनेमध्ये चर्चा सुरु आहे. ठाकरेंच्या शिवसेनेमधून शिंदेंच्या शिवसेनेत आलेल्या खासदारांमध्ये संजय जाधव जेष्ठ खासदार आहेत. संजय जाधव यांच्या माध्यमातून मराठवाड्यात पक्ष संघटन आणखी मजबूत करण्याचा शिवसेनेचा मानस आहे. मात्र, शिंदे गटाच्या सर्व खासदारांमध्ये सर्वात ज्येष्ठ असलेल्या प्रतापराव जाधव यांना वगळायचं की नाही? यावरून शिंदे यांच्या शिवसेनेत चर्चा सुरू असल्याचं सांगण्यात येत आहे.

# मुंबई-गोवा महामार्गाला ग्रामस्थांकडून हिरवाईची भेट

## तळेकांटे ग्रामस्थ लावणार २ हजार झाडे

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



***संगमेश्वर*** – मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामामुळे निर्माण झालेली रखरख आणि वाढते तापमान कमी करण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील तळेकांटे ग्रामस्थांनी पुढाकार घेतला आहे. गावातील हजार ते दीड हजार रहिवाशांनी एकत्र येत महामार्गाच्या दुतर्फा दोन हजार झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. या मोहिमेची सुरुवात येत्या २८ जून रोजी सप्तलिंगी पूल ते बावनदी पुलापर्यंतच्या चार किलोमीटर अंतरावर श्रमदानाने करण्यात येणार आहे. यादरम्यान झालेल्या चर्चेतून महामार्गाच्या कामासाठी सोळा वर्षांपूर्वी तोडलेल्या झाडांची उणीव सर्वांना प्रकर्षाने जाणवली. त्यानंतर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शरद कदम यांच्या संकल्पनेतून गावकऱ्यांनी सरकारी मदतीची वाट न पाहता स्वतः वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेतला. वड, पिंपळ, चिंच आणि उंबर यांसारख्या स्थानिक प्रजातींच्या झाडांची निवड करण्यात आली असून, महामार्गाचे वाढलेले तापमान आणि हवामान बदलाचा धोका कमी करणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. वृक्षारोपणासह झाडांच्या संगोपनासाठी ग्रामस्थांनी निधी संकलनाचे आवाहन केले आहे. महामार्गासाठी सातत्याने आंदोलने होत असताना, २८ जून रोजी रस्ता अडवण्याऐवजी वृक्षारोपणासारखा विधायक मार्ग निवडल्याने तळेकांटे गावाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या उपक्रमातून प्रेरणा घेऊन इतर गावेही महामार्गावर हिरवळ निर्माण करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. निधी संकलनाचे आवाहन झाडांना संरक्षण देण्यासाठी लोखंडी जाळ्या आणि पुढील वर्षापर्यंत पाणी उपलब्ध करून देण्यासाठी टँकरची व्यवस्था गावकरी स्वतःच्या ताकदीवर करणार आहेत. या कार्यात परदेशात आणि शहरात राहणारी गावातील तरुणाई समाज माध्यमांच्या माध्यमातून सक्रिय झाली असून, जुन्या जाणत्या लोकांसोबत खांद्याला खांदा लावून काम करत आहे.

# पेपरफुटीमुळे देशाचे शैक्षणिक भविष्य धोक्यात

## केंद्र सरकारवर कन्हैया कुमार यांची टीका

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**पुणे** – देशातील शिक्षण आणि परीक्षा व्यवस्थेत निर्माण झालेला गोंधळ, वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या घटना आणि त्यातून विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान यामुळे देशाचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आले असून, या गंभीर प्रश्नावर केंद्र सरकार मौन बाळगून असल्याची टीका काँग्रेस नेते कन्हैया कुमार यांनी केली.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने सुरू केलेल्या 'छात्रों की गूंज' या देशव्यापी मोहिमेअंतर्गत गुरुवारी पुण्यासह देशातील २८ प्रमुख शहरांमध्ये पत्रकार परिषदांचे आयोजन करण्यात आले. त्यानिमित्त पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत कन्हैया कुमार बोलत होते.

शिक्षण क्षेत्रातील वाढत्या खासगीकरणावरही त्यांनी चिंता व्यक्त केली. भारतीय पालक आपल्या मुलांच्या शिक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च करत असून, शिक्षण व्यवस्था जाणीवपूर्वक कमकुवत केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. आयआयटी, एम्स आणि यूपीएससीसारख्या प्रतिष्ठित संस्थांच्या विश्वासार्हतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा दावा त्यांनी केला. देशात विविध परीक्षांचे ८० हून अधिक वेळा पेपर फुटल्याचा आरोप करत, प्रत्यक्ष आकडा यापेक्षाही मोठा असू शकतो, असे ते म्हणाले.


नुकत्याच झालेल्या री-नीट परीक्षेतही कथित 'सॉल्वर गँग' पकडल्या गेल्याचा उल्लेख करत, सरकारला निष्पक्ष परीक्षा घेणेही शक्य होत नाही का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

पुण्यातूनच पेपरफुटी प्रकरणातील पहिला आरोपी पकडला गेल्याचा उल्लेख करत त्यांनी तपासाच्या पद्धतीवरही प्रश्न उपस्थित केले. आरक्षण हा संविधानाने दिलेला अधिकार असून तो कोणावरही उपकार नसल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षण हा श्रीमंतांचा विशेषाधिकार नसून प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# एनसीईआरटी कडून नववीच्या सामाजिक शास्त्र विषयातून संविधानाची प्रस्तावनाच वगळली

## 'समाजवादी' आणि 'धर्मनिरपेक्ष' शब्दांनाही केराची टोपली, वादग्रस्त ठरलेल्या एसआयआर, आणीबाणीचा समावेश

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – एनसीईआरटीने इयत्ता नववीच्या सामाजिक शास्त्राच्या पाठ्यपुस्तकात वादग्रस्त ठरलेला मतदार यादी सुधारणा कार्यक्रम आणि 'आणीबाणी' यावर एक नवीन धडा जोडला आहे.

पाठ्यपुस्तकात स्पष्ट केले आहे की, मतदार यादी अद्ययावत करणे, मतदारांची पडताळणी करणे आणि मतदार यादीतील चुका दुरुस्त करणे हे एसआयआरचे प्राथमिक कार्य आहे. मतदार यादीची तपासणी केल्याने निवडणूक प्रक्रिया अधिक मजबूत होऊ शकते, हे समजण्यासही या धड्यामुळे विद्यार्थ्यांना मदत होईल. दुसरीकडे, पाठ्यपुस्तकातून संविधानाची प्रस्तावना वगळण्यात आली आहे. 'समाजवादी' आणि 'धर्मनिरपेक्ष' हे शब्दही वगळण्यात आले आहेत. पाठ्यपुस्तकात एक स्वतंत्र विभाग जोडण्यात आला आहे.

बिहार आणि गुजरातमध्ये मोठी जनआंदोलने झाली 'समाज समजून घेणे: भारत आणि त्यापलीकडे' या धड्यात आणीबाणीला लोकशाहीसमोरील सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक म्हणून वर्णन केले आहे. या धड्यात संविधानाची निर्मिती, लोकशाही संस्था आणि मूलभूत हक्क यांवर चर्चा केली असली तरी, त्यात 'सार्वभौम', 'समाजवादी', 'धर्मनिरपेक्ष', 'लोकशाही' आणि 'प्रजासत्ताक' यांसारख्या संज्ञांचा उल्लेख नाही. नववीच्या पाठ्यपुस्तकात लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या भूमिकेवरही सविस्तर माहिती दिली आहे. त्यात म्हटले आहे की, त्यांनी विद्यार्थी आणि सामान्य जनतेला संघटित केले, ज्यामुळे बिहार आणि गुजरातमध्ये मोठी जनआंदोलने झाली.

पुस्तकानुसार, १९७७ मध्ये आणीबाणी संपल्यानंतर सार्वत्रिक निवडणुका झाल्या. जनतेने मतदानाच्या माध्यमातून आपले मत व्यक्त केले आणि सत्ताधारी सरकार निवडणुकीत हरले. भारतीय लोकशाहीच्या सामर्थ्याचे उदाहरण म्हणून पुस्तकात याचा उल्लेख केला आहे. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली आणीबाणीच्या काळात लागू केलेल्या ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे (१९७६) 'धर्मनिरपेक्ष', 'समाजवादी' आणि 'अखंडता' हे शब्द भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेत जोडले गेले. हे शब्द पूर्वी संविधानात नव्हते, पण ते आजही आहेत.

इंदिरा गांधी सरकारविरोधात जनतेचा असंतोष वाढत होता पुस्तकात म्हटले आहे की, १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला इंदिरा गांधी सरकारविरोधात जनतेचा असंतोष वाढत होता. बेरोजगारी, महागाई आणि गैरव्यवस्थापनाच्या आरोपांमुळे अनेक ठिकाणी आंदोलने झाली. यानंतर, जून १९७५ मध्ये अंतर्गत अशांततेच्या कारणास्तव राष्ट्रीय आणीबाणी लागू करण्यात आली.

# ओमराजे निंबाळकरांची खासदारकी धोक्यात?

### मल्हार पाटलांच्या राजकीय चाल चर्चेत

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मुंबई** – धाराशिवच्या राजकारणातील पारंपरिक राजकीय संघर्ष आता एका नव्या वळणावर येऊन पोहोचला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून महायुतीत प्रवेश केलेले विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या अडचणीत आगामी काळात मोठी वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

भाजपचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे सुपुत्र आणि भाजपचे युवा नेते मल्हार पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने धाराशिव शहरात लावण्यात आलेल्या बॅनर्सनी संपूर्ण जिल्ह्याचे राजकीय वातावरण ढवळून काढले आहे. या बॅनर्सवर मल्हार पाटील यांचा उल्लेख थेट 'भावी खासदार' असा करण्यात आला असून, त्यावर 'चझ२०२९' असे ठळकपणे लिहिण्यात आले आहे. या थेट आव्हानामुळे खासदार ओमराजे निंबाळकर यांची खासदारकी २०२९ च्या आगामी निवडणुकीत धोक्यात येणार असल्याची जोरदार चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे. महायुतीतील अंतर्गत धुसफूस चव्हाट्यावर काही दिवसांपूर्वीच खासदार ओमराजे निंबाळकर यांनी महायुतीमध्ये प्रवेश केला होता. महायुतीमधील सर्व घटक पक्ष एकत्र येऊन काम करतील अशी अपेक्षा असताना, भाजपचे युवा नेते मल्हार पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी थेट लोकसभेच्या जागेवरच दावा ठोकल्याने महायुतीमधील अंतर्गत विसंवाद समोर आला आहे. थेट खासदारकीला आव्हान धाराशिव शहरात मुख्य चौकाचौकांमध्ये झळकलेले हे बॅनर्स पाहून सर्वसामान्य नागरिक आणि राजकीय विश्लेषकांमध्ये एकच चर्चा सुरू आहे की, मल्हार पाटील हे आगामी २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत ओमराजे निंबाळकर यांच्या विरोधात मैदानात उतरण्यासाठी आतापासूनच सज्ज झाले आहेत.

# 'जय भवानी, जय शिवाजी'...: किल्ले रायगडावर ३५३ व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचा अभूतपूर्व उत्साह, शिंदेंची उपस्थिती

(प्रतिनीधी वरूड दर्पण)





**रायगड** – किल्ले रायगड येथे आज तिथीनुसार ३५३ वा शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. या सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो शिवप्रेमी आणि पर्यटक रायगडावर दाखल झाले होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवराज्याभिषेकाचा मुख्य सो–हळा पार पडला. ब्रह्मवृंद यांच्या वेदमंत्र आणि मंत्रोच्चारात हा राज्याभिषेक सोहळा पार पडला. सोहळ्यादरम्यान संपूर्ण रायगड परिसर 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी दुमदुमून गेला. शिवराज्याभिषेकानिमित्त गडावर पारंपरिक धार्मिक विधी, पूजन आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. राज्यभरातून आलेल्या शिवभक्तांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून स्वराज्याच्या इतिहासाला वंदन केले. मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलीस आणि जिल्हा प्रशासनाने कडेकोट सुरक्षा व्यवस्था तसेच वाहतूक नियोजन केले होते. गडावर येणाऱ्या भाविकांसाठी पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा आणि आपत्कालीन सेवांची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. ऐतिहासिक परंपरा, स्वराज्याचा गौरव आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे स्मरण करून देणारा हा ३५३ वा शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# प्रभू श्रीराम भोंदूंच्या गराड्यात सापडले, त्यांच्या सुटकेसाठी शिवसेना 'भाजप मुक्त राम' मोहीम हाती हाती घेईल

## त्याची पहिली ठिणगी आंदोलनाच्या रुपात महाराष्ट्रात पडेल : उद्धव ठाकरेंचा एल्गार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** - प्रभू श्रीराम सध्या भोंदू लोकांच्या गराड्यात सापडले असून, त्यांच्या सुटकेसाठी शिवसेनेला आता 'भाजपा मुक्त राम' ही मोहीम हाती घ्यावी लागेल आणि त्यासाठी महाराष्ट्रभरात पहिली ठिणगी टाकून आंदोलन सुरू केले जाईल, अशी घोषणा उद्धव ठाकरे यांनी केली.

नीट पेपरफुटी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, महिलांवरील वाढते अत्याचार, पीक विम्याची अपूर्णता आणि राम मंदिराच्या नावाखाली होणारी लूट या मुद्द्यांवर संसदेत तोंड उघडण्याचे धाडस गद्दारांच्या रक्तात उरले आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. गद्दारांमध्ये राजीनामा देण्याची हिंमत नाही, त्यामुळे दोन किंवा तीन वर्षांनी जेव्हा केव्हा निवडणुका होतील, तेव्हा पुन्हा एकदा शिवसेनेचाच कट्टर खासदार निवडून आणण्यासाठी आजपासूनच पूर्ण ताकदीने तयारीला लागा. जोपर्यंत निष्ठावंत शिवसैनिक आणि जनता सोबत आहे, तोपर्यंत कोणी कितीही प्रयत्न केले तरी ठाकरे आणि शिवसेना ही संघटना कोणीही संपवू शकत नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ठाकरे यांनी फुटीर खासदारांच्या मतदारसंघात सभांची सुरुवात केली असून आज यवतमाळमध्ये त्यांची तोफ धडाडली. मोदी शाहांचा राजकीय जन्म झाला असता का? लोकमान्य टिळक किंवा महात्मा गांधी यांनी कधी 'विकास निधी मिळत नाही' म्हणून चळवळ थांबवली नव्हती.

# आमदारांना तेव्हा ५० कोटी दिले गेले असं म्हणत असतील, तर खासदारांना किती दिले गेले असतील?

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – ज्यावेळेला खासदार निवडून आले, तेव्हा मीच दौरा केला होता आणि मीच दौरा केल्यानंतर माझ्याच शब्दावर हे खासदार निवडून आले होते, तेव्हा यांना घरी बसवलं होतं, जे हारले होते ते बोंबलतायत, त्यांचा बेंबीचा देठ कुठपर्यंत आहे मला माहिती नाही, पण तिथपासून हे बोंबलतायत, आता दौरा करून फायदा नाही, पण मी दौरा केला होता म्हणूनच हे खासदार निवडून आले होते, अशा शब्दात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी तोफ डागली.

**क्षमा मागण्यासाठी महाराष्ट्रामध्ये फिरणार**

उद्धव ठाकरे म्हणाले, आजपासून मी या सर्व गद्दारांच्या मतदारसंघातील माझ्या कट्टर शिवसैनिकांना भेटण्यासाठी आणि त्याचबरोबरीने इथल्या ज्या मतदारांनी केवळ आणि केवळ शिवसेनेवर, शिवसेनाप्रमुखांचा चेहरा बघून आणि मशाल बघून आम्ही जो उमेदवार दिला, त्याला त्याचं काही पार्श्वभूमी किंवा इथं काही न बघता निवडून दिलं, त्या सर्व मतदारांची आणि शिवसैनिकांची मी माफी मागेन किंवा क्षमा मागण्यासाठी महाराष्ट्रामध्ये फिरणार आहे. मागील बंडखोरीचा संदर्भ देत ते म्हणाले, तेव्हा सर्वत्र गावात, खेड्यापाड्यात सभा गाजली होती. अगदी मला आठवतंय विदर्भामध्ये बैलपोळ्याच्या दिवशी बैलांवरती सुद्धा ते लिहिलं गेलं होतं. आता आमदारांना जर तेव्हा ५० कोटी दिले गेले असं म्हणत असतील, तर खासदारांना किती दिले गेले असतील? हा एक हिशोब ज्याला लावायचा तो लावू शकतो.

**त्यांना मात्र भरघोस हमीभाव मिळालाय**

उद्धव ठाकरे यांनी फुटीर खासदारांच्या मतदारसंघात जाऊन सभा घेणार आहेत. आज (२७ जून) ते यवतमाळमध्ये पोहोचले आहेत. ते म्हणाले की, काही शेतकऱ्यांनी मला एक निवेदन दिलं. पीक विम्याचा पत्ता नाही, हमीभाव मिळतोय की नाही माहित नाही म्हणत होते.

म्हणजेच शेतकऱ्याला त्याच्या मालाला हमीभाव नाही, पण आमच्या भरोशावर जे निवडून आलेले खासदार आहेत, त्यांना मात्र भरघोस हमीभाव मिळालाय. त्यामुळे या सगळ्या उपटसुंभांनी आमच्यावर टीका करण्याचं धाडस करू नये, असा टोला त्यांनी लगावला. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांची नागपूर दौऱ्यात विमानातील भेटीवर त्यांनी खोचक भाष्य केले. ते म्हणाले की, आमची आणि मुख्यमंत्र्यांची विमानामध्ये उच्च दर्जा उच्च स्तरीय चर्चा झाली. येत्या काही दिवसांत कळेल. कालच्या बैठकीचा वृत्तांत किंवा जे काही ठरलं ते येत्या काही दिवसांत कळेल.

# एमपीएससीच्या पूर्वपरीक्षा आता संगणकावर

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नवी मुंबई** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने भरती प्रक्रियेत ऐतिहासिक बदल करत राज्यातील सर्व पूर्वपरीक्षा टप्प्याटप्प्याने संगणक प्रणालीवर आधारित घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. 'महाराष्ट्र गट–क' सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा २०२६ पासून होणार असून, २६१९ पदांसाठी जाहीर झालेली ही परीक्षा सीबीटी पद्धतीनेच घेतली जाणार आहे, अशी माहिती आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी शुक्रवारी दिली. भीमनवार यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या भरती प्रक्रियेतील सुधारणांमुळे पदांची संख्या चार ते पाच पट वाढण्याची शक्यता आहे.

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या 'सूर्य रथाला' नाशिकमध्ये प्रारंभ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नाशिक** – देशात स्वच्छ आणि परवडणाऱ्या ऊर्जेला चालना देणाऱ्या 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजने'ची माहिती प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवण्यासाठी नाशिक शहरात विशेष अभियान सुरू करण्यात आले आहे.

'सिटी एक्सलरेटर प्रोग्राम' अंतर्गत 'नॅशनल सोलर एनर्जी फेडरेशन ऑफ इंडिया' म्रहावितरण, पीडब्ल्यूसी, शक्ती सस्टेनेबल एनर्जी फाउंडेशन आणि 'एनर्जीवा व्हेंचर्स' यांच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या 'सूर्य रथा'ला रोजी महावितरणचे संचालक (संचलन) धनंजय औंढेकर यांनी विद्युत भवन येथे हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ केले.

'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना देशासह राज्यात उच्चतम कामगिरीकडे वाटचाल करत आहे. या योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी राज्यातील नाशिकसह चार मुख्य शहरांमध्ये 'सूर्य रथ' उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरेल. सध्या राज्यात ६ हजारांहून अधिक वेंडर्स सक्रिय असून या योजनेमुळे रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होत आहेत. नागरिकांच्या शंका व प्रश्नांचे तत्काळ निवारण करण्यासाठी या योजनेचा फायदा घेण्यासाठी या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणचे संचालक (संचलन) धनंजय औंढेकर यांनी यावेळी केले.

या प्रसंगी 'नॅशनल सोलर एनर्जी फेडरेशन ऑफ इंडिया'चे प्रसून आनंद आणि 'एनर्जीवा व्हेंचर्स'चे अभिषेक कुलश्रेष्ठ यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी अभियंता योगेश निकम यांनी केले. सूत्रसंचालन समीर वडजे यांनी तर आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी विकास आढे यांनी केले.

हा सूर्य रथ पुढील सात दिवस नाशिक शहरातील द्वारका–पाथर्डी, सातपूर, सिडको, गंगापूर आणि पंचवटी व नाशिक रोड सह शहरातील मुख्य भागांतील प्रमुख बाजारपेठा, रुग्णालये, शाळा, महाविद्यालये आणि निवासी वस्त्यांमध्ये फिरणार आहे.

### तुकाराम मुंढेंचा ॲमेझॉन इंडियाला मोठा दणका

# मुदतबाह्य अन्नपदार्थ विकणाऱ्या गोदामाचा थेट परवाना रद्द

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या राज्यात बेकायदेशीर आणि मानवी आरोग्याशी खेळणाऱ्या घटकांविरोधात कारवायांचा धडका सुरू आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून भिवंडी तालुक्यातील सरवली येथील 'ॲमेझॉन रिटेल इंडिया' या नामांकित कंपनीच्या गोदामावर अन्न सुरक्षा पथकाने मोठी कारवाई केली आहे. मुदतबाह्य झालेले आणि मानवी आरोग्यास घातक ठरणारे अन्नपदार्थ नष्ट न करता, नागरिकांची दिशाभूल करून ते पुन्हा विक्रीसाठी अन्नसाखळीत वळवल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी ॲमेझॉन रिटेलच्या फॅसिलिटी मॅनेजरसह दोघांविरोधात कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सरवली येथील 'ॲमेझॉन रिटेल इंडिया प्रा. लि.' आणि 'आर. के. ट्रेडर्स' यांच्या संगनमताने मुदतबाह्य झालेले अन्नपदार्थ नष्ट न करता ते पुन्हा बाजारात विक्रीसाठी पाठवले जात असल्याची खात्रीशीर माहिती अन्न सुरक्षा पथकाला मिळाली होती.

### क्षुल्लक कारणावरुन वाद

# एकाने दुसऱ्यास लाकडी पाटी मारुन केले जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – क्षुल्लक कारणावरुन एकाने दुसऱ्यास लाकडी पाटी मारुन जखमी केल्याची घटना तालुक्यातील गव्हाणकुंड येथे घडली. या प्रकरणी पोलिसांनी तिघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी लकी नागरे व आरोपी रुपराव सोनवाने यांचा जुना वाद असुन त्यांचे आपसात पटत नाही. यातील आरोपी क्र.१ हा दारु पिवुन फिर्यादीचे घरासमोर आला व विनाकारण शिवीगाळ करत होता म्हणुन फिर्यादीने त्यास म्हटले की, शिवीगाळ करु नको तर त्याने बांधकामाची लाकडी पाटी फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केले व आरोपी क्र.२ व ३ यांनी सुध्दा शिवीगाळ करुन थापडा बुक्यांनी मारहाण करुन मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी फिर्यादी लकी धिरण नागले (२९) रा.गव्हाणकुंड याचे तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी रुपराव शेषराव सोनवाने (४५) याचेविरुध्द कलम ११८ (१), ३५२, ३५१ (२), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.

## दिनविशेष

२००२ - जी-8 देशांनी रशियाच्या अण्वस्त्रे नष्ट करण्याच्या योजनेला सहमती दिली.

## सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१३६८२० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने -१३०३०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - २,३१,१५४ रु. (प्र.किलो)

## कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | ३००० |
| तूर - | ६१०० - | ६३९० |
| मूग - | ६५०० - | ७००० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५६०० - | ५९०० |
| सोयाबिन - | ४१०० - | ४३५० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ८२०० - | ९३०० |
| भुईमूग - | ५१५० - | ५३५० |
| मका - | २२०० - | २३०० |

### उपनगरातही मुद्रांक शुल्क घोटाळा

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची कबुली

## सरकारी तिजोरीचे १० कोटींचे नुकसान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्य सरकारने नवी मुंबईतील मुद्रांक शुल्क घोटाळ्याच्या चौकशीचे आदेश दिले असताना आता मुंबई उपनगरातील अंधेरी, बोरिवली, वरळी येथे मुद्रांक शुल्काचा घोटाळा उघड झाला असून त्यामुळे राज्य सरकारचा १० कोटी रुपयांहून अधिक महसूल बुडाला आहे. याबद्दल मार्च २०२६ मधील 'कॅग'च्या अहवालात ठपका ठेवण्यात आल्याची कबुली महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत एका लेखी प्रश्नाच्या उत्तरात दिली.

जनसुराज्य शक्ती पक्षाच्या अशोकराव माने यांनी मुद्रांक शुल्क प्रक्रियेत पारदर्शकता आणून महसूलवाढीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. त्यात मुंबईतील बोरिवली, वरळी, अंधेरी या भागात मुद्रांक शुल्काचे चुकीचे वर्गीकरण करून सरकारचा १० कोटी रुपयांहून अधिक महसूल बुडवल्याचे मार्च २०२६ मध्ये 'कॅग'च्या अहवालातून निदर्शनाला आले आहे काय, असा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात बावनकुळे यांनी महसूल बुडाल्याचे मान्य केले आहे. दरम्यान, 'कॅग' अहवालात मुद्रांक शुल्कातील गंभीर त्रुटींवर बोट ठेवण्यात आले होते. अनेक ठिकाणी अधिकारी स्वतःच्या 'अर्धन्यायिक' अधिकारांचा गैरवापर करून बिल्डरांशी हातमिळवणी करत आहेत. आधी मुद्रांक शुल्क जाणीवपूर्वक जास्त दाखवणे आणि नंतर काही नियमबाह्य सवलती देऊन ते कमी करणे, अशा पद्धतीने सरकारी महसूल बुडवला जात आहे.




# पोलिसांच्या मते चेतन हाच सूत्रधार

## सियाला केतनविरुद्ध भडकवले, शेवटचा धक्काही त्यानेच दिला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – केतन अगरवालला संपवण्यासाठी त्याची वाग्दत्त वधू सिया गोयल हिला तिचा मित्र व सहआरोपी चेतन चौधरी यानेच भडकवले होते, असा दावा एका पोलीस अधिकाऱ्याने शुक्रवारी केला. दरम्यान, आता या प्रकरणात सियाच्या भावाचीही चौकशी करण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

चेतन याने म्हटल्यानुसार या कटाची आखणी करण्यात आली असावी, असे पोलिसांनी आता सूचित केले आहे. त्यानुसार लोहगड किल्ल्यावर त्या विशिष्ट कड्यावर गेल्यानंतर सियाने आधी ठरवल्यानुसार एक खूण केली व चेतनने केतनला कड्यावरून ढकलून देण्यासाठी धक्का दिला असे या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या एका अधिकाऱ्याने सांगितले. केतन विग लावत असल्यामुळे सियाला तो आवडत नव्हता अशा बातम्या काही ठिकाणी प्रसिद्ध झाल्या आहेत. परंतु केवळ याच कारणास्तव सिया त्याला नापसंत करत होती, असे ठामपणे म्हणता येणार नाही.







